# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अंजनेरी (जि.नाशिक) येथे साहसी क्रीडा प्रकारांचे नोडल सेंटर उभारण्याबाबत तसेच ट्रेकींग इन्स्टिट्युटचे काम पुर्ण करण्याबाबत

**(१) ५९२१ (१९-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनेरी (जि.नाशिक) येथे साहसी क्रीडा प्रकारांचे नोडल सेंटर उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ठिकाणी ट्रेकींग इन्स्टिट्युटचे काम पुर्ण होवूनही सदर इन्स्टिट्युट सुरु करण्यासाठी शासकीय यंत्रणाकडून दिरंगाई केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही. अंजनेरी (जि.नाशिक) ट्रेकींग इन्स्टिटयुटचे बांधकाम अद्याप पुर्ण झालेले नाही.

(३) सदर ट्रेकींग इन्स्टिटयुटच्या कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने दिनांक १ डिसेंबर, २०१३ पासून कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही म्हणून प्रतिदिन रु.१०००/- प्रमाणे नुकसान भरपाई वसूल करण्यात आली आहे. तसेच निविदा शर्तीनुसार सदर काम ठेकेदाराकडून काढून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून दिलेल्या मोफत पुस्तकांचे संच गहाळ झाल्याबाबत**

**(२) २७४०७ (०६-०८-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शासनाकडून दिलेल्या मोफत पुस्तकांपैकी १ लाख ९९ हजार २४४ पुस्तकांचे संच गहाळ झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या सहसंचालकांनी जबाबदार व्यक्तींना पत्र पाठवून याबाबतचा खुलासा मागितला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने गहाळ झालेले पुस्तक संच मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सन २०१५-१६ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकासाठी जिल्हास्तवरुन प्राप्त माहिती नुसार १,९९,२४४ पुस्तकांच्या संचांची तफावत दिसून येत होती. यामुळे याबाबतचा खुलासा जिल्ह्यांकडून मागविण्यात आला होता. तथापि, मागील वर्षी शिल्लक असलेली पुस्तके विचारात घेऊन सन २०१५-१६ साठी सदर शिल्लक पुस्तके वगळून आवश्यक तेवढ्याच पाठयपुस्तकांची मागणी जिल्हास्तरावरुन करण्यात आली असल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा तालुक्यात अल्ट्राटेक कंपनीकडून नाल्यात सोडल्या जाणा-या रासायनिक सांडपाण्यामुळे शेतीचे झालेले नुकसान**

**(३) २९४२१ (१५-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यात अल्ट्राटेक कंपनीकडून नाल्यात सोडल्या जाणा-या रासायनिक सांडपाण्यामुळे शेतीचे नुकसान होत असल्याची बाब माहे आक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) वरील बाब निदर्शनास आल्याने सदर उद्योगास दि.७.९.२०१५ रोजी प्रस्तावित आदेश व दि.२९.९.२०१५ रोजी उद्योगाची वैयक्तिक सुनावणी घेऊन अंतरिम आदेश देण्यात आले. अंतरिम आदेशात नमूद करण्यात आलेल्या कामासाठी उद्योगाकडून रू.५ लाख बँक हमी घेण्यात आली आहे. अंतरिम आदेशाचे पालन होते किंवा कसे या पाहणीकरीता दि.२६.१०.२०१५, दि.१०.२.२०१६ व दि.८.३.२०१६ रोजी सदर उद्योगास भेट करण्यात आली. त्यानुसार उद्योगाकडून अंतरिम आदेशाचे पालन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## फुलंब्री तालुक्यातील ३८ वस्ती शाळा बंद करण्यात येणार असल्याबाबत

**(४) ३३१७५ (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री तालुक्यातील ३८वस्ती शाळेत शासनाच्या नियमापेक्षा कमी विद्यार्थी संख्या असल्याने या वस्ती शाळा बंद करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वस्तीशाळांमधील शिक्षकांचे इतर शाळांत समावेशन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दुकानांमध्ये फीचर्स मर्यादीत असलेल्या स्वस्त दरातील चिनी बनावटी मशिन्समध्ये नवीन नोटांच्या डेटाबेस बद्दल माहिती उपलब्ध नसल्याबाबत

**(५) ३८२०० (२०-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुकानांमध्ये सध्या स्वस्त दरात फीचर्स मर्यादित असलेल्या चिनी बनावटीच्या मशिन्स उपलब्ध असून किमतीच्या मानाने या मशिन्समध्ये नवीन नोटांच्या डेटाबेस बद्दल माहिती उपलब्ध नसल्याने कोणतीही नवीन नोट चालनात आली तरीही बऱ्याचदा ती नोट खोटी असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादम्यान त्या मशिन्सद्वारे दाखवले जात असल्याचे निष्पन्न होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चिनी बनावटीच्या मशिन्समुळे नवीन नोटा खोट्या असल्याचा गैरसमज बऱ्याच लोकांना होत असल्याचे व याबाबतच्या तक्रारी वारंवार बँकेकडे येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चिनी बनावटीच्या मशीन विक्रीवर शासनातर्फे आजवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-१२-२०१६) :** (१), (२), (३) व ४) उक्त बाब भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई यांचे अखत्यारित येत असल्याने त्यांना दि.१६.११.२०१६ चे पत्रान्वये उचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

---

**दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) येथील सर्व कचरा गावोगावच्या ओढ्यात जमा होऊ लागल्याने प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(६) ४२२७० (२८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) येथे खाजगी आणि सार्वजनिक ठिकाणचा जमा होणारा सर्व कचरा गावोगावच्या ओढ्यात जमा होऊ लागल्याने प्रदूषणाची गंभीर समस्या ग्रामीण भागात निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याबाबत तसेच ओढ्यात साचलेली घाण स्वच्छ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-१२-२०१६) :** (१) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीमध्ये ओढ्यामध्ये कचरा जमा झाल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धनगरवाडी (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील मे.डॉ.जगताप प्रा.लि., या संस्थेला बायो मेडीकल वेस्टची विल्हेवाट लावण्याकरिता परवानगी देण्याबाबत**

**(७) ४२४७३ (२८-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील बायो मेडीकल वेस्टची विल्हेवाट लावणेबाबत मे.डॉ.जगताप प्रा.लि. धनगरवाडी (ता.खंडाळा, जि.सातारा) या शासनमान्य संस्थेला परवानगी देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री महोदयांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-१२-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दि.१७.०६.२०१६ रोजी डॉ.जगताप प्रा.लि. या संस्थेची तपासणी करण्यात आली. तपासणीत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्र बंद का करण्यात येऊ नये याकरीता संबंधितास कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत उप प्रादेशिक अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातून सीआरझेड नकाशा निश्चिती संदर्भात प्राप्त झालेल्या हरकतीबाबत**

**(८) ४४५५६ (२८-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातून सीआरझेड नकाशा निश्चिती संदर्भात ४३ हरकती प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हरकतीवर अहवाल तयार करुन महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऍथॉरेटीला पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालावर महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऍथॉरेटीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने अंतिम नकाशाची निश्चिती करण्यात आली आहे काय, त्याची रुपरेषा काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०७-१२-२०१६) : (**१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सीआरझेड नकाशा निश्चिती संदर्भात एकूण १२७० हरकती जिल्हाधिकारी, सिंधुदर्ग कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र शासनाने उच्चतम भरती रेषा पूर्वनिश्चिती करण्याचे काम नॅशनल सेंटर फॅार सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट, चेन्नई या संस्थेस सोपविले आहे. उच्चतम भरती रेषेचे पूर्वनिश्चितीकरण झाले असून सुधारीत नकाशे जाहीर करण्यची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर शहरामध्ये अल्पसंख्यांक समाज राहत असलेल्या वस्तीमधील रस्ते व गटार दुरुस्ती करण्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) ४८०५३ (०७-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहरामध्ये अल्पसंख्यांक वस्तीमधील रस्ते व गटारे दुरुस्ती करण्याच्या कामासाठी उपलब्ध निधी करुन देण्याबाबतची मागणी तेथील लोकप्रतिनिधी यांनी मा. अल्पसंख्यांक मंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू रस्त्यांच्या व गटारांच्या दुरावस्थेमुळे भिवंडी-निजामपूर शहरामधील अल्पपसंख्यांक समाजातील नागरीकांना रहदारीसारख्या मोठया समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

(३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने अल्पसंख्याक विकास विभाग शा.नि.क्र.क्षेविका २०१५/प्र.क्र.७६ (भाग-१)/का-९, दि.२३/११/२०१५ अन्वये रु.१९,९९,८८०/- व शा.नि.क्र. क्षेविका २०१६/ प्र.क्र.४३, दि.३१/०३/२०१६, या शासन निर्णयान्वये एकूण रु.८५,००,०००/- असे सर्व एकूण रु.१,०४,९९,८८०/- इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली असून विहित मर्यादेत अनुदान वितरीत केले आहे.

भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार त्याना निधी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेठ (ता.वाळवा, जि.सांगली) येथील हंसाजीराव बळवंत पाटील विद्‌यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय सहायक शिक्षीकेचा निलंबित कालावधी नियमित करण्याबाबत**

**(१०) ४९६३९ (२६-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (ता.वाळवा, जि.सांगली) येथील हंसाजीराव बळवंत पाटील विद्‌यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय सहायक शिक्षीकेचा निलंबित कालावधी नियमित करण्याबाबत संस्थेने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सांगली यांना पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यास एक वर्ष होऊनही निर्णय न घेतल्यामुळे समतावादी महासंघाच्यावतीने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करुन, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी माध्यमिक शिक्षणाधिकारी व कार्यालयीन अधीक्षक हे मागासवर्गीयांच्या बाबतीत सुडबुध्दीने वागतात अशी तक्रार करण्यात आली आहे, ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी प्राप्त झालेल्या निवेदनाचे अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शासनाने संबंधीत शिक्षणाधिकारी वा कार्यालयीन अधीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली आहे तसेच सदर शिक्षिकेचा निलंबित कालावधी नियमित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर शिक्षिकेविरुध्द दाखल गुन्ह्यात दिनांक २४/०३/२०१३ ते २५/०६/२०१३ या कालावधीत त्या पोलीस कस्टडीत असल्यामुळे संबंधित संस्थेने त्यांना सेवेतून निलंबित केले. सत्र न्यायालयात दाखल दाव्याचा निकाल शिक्षिकेच्या बाजूने लागल्यानंतर निलंबित कालावधी नियमित करण्याकरीता प्रस्ताव शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यांचे कार्यालयास दि.१५/०७/२०१५ रोजी प्राप्त झाला सदर प्रस्तावाच्या छाननीअंती त्यांच्या दि.२४/०३/२०१३ ते ३०/८/२०१३ हा कालावधी महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या

शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदीनुसार नियमित करुन सेवेचे लाभ देणेबाबत संस्थेस दि.३१/१२/२०१५ रोजी कळविण्यात आले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील नवसहयाद्री एज्युकेशन सोसायटी, नायगांव या शैक्षणिक संस्थेला सार्वजनिक व निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन**

**(११) ४९८१३ (१२-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील नवसहयाद्री एज्युकेशन सोसायटी, नायगांव या शैक्षणिक संस्थेला मौजे नायगांव येथील गट क्र. ६९, ७० व ७१ पै.क्षेत्र ७०४८० चौ.मी. शेती व नाविकास क्षेत्रातून वगळून सार्वजनिक व निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करणेबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक २५ जून, २०१५ व दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१२-२०१६) :** (१) होय.
(२) शासनाने शेती तथा ना-विकास विभागामध्ये जिल्हाधिकारी स्तरावर शैक्षणिक तथा वैद्यकीय वापराच्या सार्वजनिक/निमसार्वजनिक इमारतींना मुळ ०.२० चटई क्षेत्र निर्देशांकाचेवर १.०० पर्यंत वाढीव चटई क्षेत्राचे अधिमूल्य आकारुन मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१५/०६/२०१५ रोजी निर्गमित केला असल्याने आता अशा प्रकरणी जागेवर वापर बदल करण्याची आवश्यकता नाही.
(३) लागू नाही.

---

**वाशिम जिल्हयातील शिक्षण विभागाचे रिक्त पदे भरण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष**

**(१२) ४९८७२ (१२-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील राजुरा, सुकांडा, सुदी, मारसूळ, देवठाणा, पांगराबंदी या शाळेतील उच्चश्रेणी मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत असून याकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच उक्त जिल्हयातील पाच पंचायत समित्यांमध्ये गट शिक्षणाधिकाऱ्यांची पदे दोन वर्षापासून रिक्त असतांना सदरहू ठिकाणी बाहेरचे अधिकारी रुजू होण्यास तयार नसल्यामुळे या पाचही पंचायत समित्यांमधील गटशिक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी शिक्षण विस्तार अधिकारी किंवा इतर गट शिक्षणाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कारणास्तव संबंधित विभागातील शिक्षण विभागातील कार्यरत कर्मचारी अधिकाऱ्यांना नियमानुसार पदोन्नती देण्याबाबत शासनाकडून माहिती मागविण्यात आली होती त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) सदरहू शाळांतील रिक्त असलेली मुख्याध्यापकांची पदे बिंदु नामावली मंजूरीअंती भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच पदवीधर शिक्षकांची पदे भरण्याच्या कार्यवाहीस न्यायालयाने दिलेला स्थगन आदेश शिथील केल्यामुळे पदवीधर शिक्षकांची पदे भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.
(३) सद्य:स्थितीत वाशिम जिल्हयातील सहा तालुक्यातील रिसोड व मानोरा तालुका वगळता इतर चार तालुक्यामध्ये गटशिक्षणाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. इतर दोन तालुकयामध्ये संबंधित पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(४) शिक्षण विभागातील कार्यरत कर्मचारी अधिकाऱ्यांना नियमानुसार पदोन्नती देण्यात आली असून चार तालुक्यामध्ये गटशिक्षणाधिकारी यांची पदे भरण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविदयालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांना कालबध्द पदोन्नतीसाठी देय असणा-या ग्रेड वेतनाबाबत

**(१३) ४९९४६ (२६-०५-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविदयालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांना कालबध्द पदोन्नतीसाठी देय असणा-या ग्रेड वेतनाबाबतच्या प्रश्नासंदर्भात उत्तर महाराष्ट्र विदयापीठ महाविदयालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ जळगांव यांनी वारंवार सहसंचालक,शिक्षण संचालक व मा.प्रधान सचिव यांच्याकडे पत्रव्यवहार केला असतानाही सदर प्रश्न गत सहा वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय. प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांना पदोन्नतीकरीता स्वतंत्र सेवाज्येष्ठता यादीत अथवा एकत्रित वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवाज्येष्ठता यादीत रहावयाचे आहे किंवा नाही याबाबत एक महिन्यामध्ये विकल्प देण्याबाबतचे संचालक, उच्च शिक्षण यांचे दि.७.७.२००३ चे पत्र उशिरा प्राप्त झाल्यामुळे ज्यांना विकल्पांची संधी मिळाली नाही, अशा प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांना सदर पत्र रद्द करुन विकल्पाची एक संधी द्यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार उचित कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विभागीय सहसंचालक तसेच लेखाधिकारी, सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये यांना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव यांच्या कार्यालयाकडे सद्य:स्थितीत ३० प्रस्ताव प्राप्त झाले असून सदर प्रस्तावांची छाननी करुन वेतननिश्चिती करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षकांच्या अधिवेशन काळात बोर्डी परिसरातील आदिवासी पाड्यांवरील प्राथमिक शाळा बंद ठेवल्याबाबत**

**(१४) ५१२७३ (१२-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ या संघटनेने नवी मुंबई येथे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात शिक्षकांचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अधिवेशन काळात बोर्डी परिसरातील मानपाडा, वाघमारापाडा, नागणकस, शंकरपाडा, बीजपाडा, अस्वाली या आदिवासी पाड्यांवरील प्राथमिक शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने त्याची चौकशी केली आहे काय त्या चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानुसार संबंधितांवर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औकाफ मंडळाची मागील दीडवर्षात एकदाही बैठक बोलावण्यात आली नसल्यास**

**(१५) ५३२५५ (२८-०४-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औकाफ मंडळाची मागील दीडवर्षात अर्थात आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि २०१५-१६ दरम्यान एकदाही बैठक बोलावण्यात आली नाही, औकाफच्या जागेतील भाडेकरुंकडून मागील तीन वर्षात एका पैशाचेही भाडे वसूल न झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या सुमारास लेखापरिक्षणाच्या माध्यमातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औकाफ मंडळाचे पूर्णत: गठन न होणे तसेच कामकाज ठप्प होऊन त्याचा विपरीत परिणाम औकाफ संपत्तीच्या देखरेख, कामकाजावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ व २ प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :** (१) अशंत: खरे आहे. वक्फ मंडळाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि २०१५-१६ दरम्यान महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर अध्यक्षांची निवड झालेली नसल्याने व विविध सदस्यासंदर्भात न्यायालयात प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यामुळे बैठक बोलविण्यात आलेली नव्हती. अध्यक्षांची निवड झाल्यानंतर दि.२३.०८.२०१६ रोजी वक्फ मंडळाची थेट नियंत्राणाखालील एकूण १०४० वक्फ संस्थांनी “The waqf properties lease Rules, २०१४” मधील तरतुदीनुसार रेडी रेकनर प्रमाणे भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणास प्रतिसाद दिलेला नसल्याने त्यांच्या विरुध्द वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही. सद्य:स्थितीत महाराष्र्ट राज्य वक्फ मंडळावर विविध संवर्गातून एकूण ७ सदस्य कार्यरत असून दि.०६.०८.२०१६ च्या शासन अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र राज्य वफ्फ मंडळावर अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) वरील १ व २ प्रमाणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरेड तालुक्यातील (जिल्हा नागपूर) सुजाता मोटघरे महिला महाविद्यालयातील संचालकांमुळे विद्यार्थी परिक्षेपासुन वंचित असल्याबाबत**

**(१६) ५३८६१ (२२-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जिल्हा नागपूर) तालुक्यातील सुजाता मोटघरे महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान भाग क्रं. १ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना संचालकांने परिक्षेत प्रवेश पत्र न दिल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेपासुन वंचित राहावे लागले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास शाळेचे संचालक व महाविद्यालयीन प्राचार्यांविरुध्द परिक्षेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने प्रश्नोक्त भाग (२) बाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्‌यापीठाच्या २००० प्राचीन वस्तू गहाळ झाल्याबाबत**

**(१७) ५४०६१ (२२-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्‌यापीठाचा प्राचीन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागातून २००० अत्यंत मौल्यवान वस्तू माहे एप्रिल, ते मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान गहाळ झालेले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरातत्व माजी विभाग प्रमुखांच्या कार्यकाळापासून प्राचीन २००० हजार वस्तू गहाळ झाल्याचे आजी पुरातत्व विभागाचे विभाग प्रमुख यांनी कार्यभार स्विकारतांना सदरचे गहाळ प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरातत्व विभागाकडे अनेक वस्तूंची नोंद व यादी उपलब्ध नसल्याने संग्रहालयातील उपलब्ध असलेल्या वस्तूंच्या ऑडिट मध्ये गेल्या काही वर्षात प्राचीन २००० हजार वस्तू गायब झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार दोषीआढळून आलेल्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-११-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. सदर विभागाव्दारे सन १६९९-६७ पासून करण्यात आलेल्या विविध क्षेत्रातील उत्खननामध्ये सापडलेल्या पुरातन वस्तुंपैकी २६६३ वस्तू व १९६६-६७ वर्षात दानात प्राप्त झालेली २२४ प्राचीन नाणी गहाळ झालेली असल्याचे पडताळणीअंती निदर्शनास आले आहे. ह्या वस्तु गहाळ झाल्याचे दि.०९ एप्रिल, २०१६ रोजी निदर्शनास आले.
(२) होय.
(३) हे खरे नाही. या विभागाकडे १९६६ व ६७ पासून विविध क्षेत्रातील उत्खननात सापडलेल्या सर्व पुरातन वस्तुंची नोंद व यादी उपलब्ध आहे.
(४) व (५) विभाग प्रमुखांनी दिनांक १० मे, २०१६ रोजी कुलगुरुंना सादर केलेल्या सविस्तर अहवालानुसार अंबाझरी पोलीस स्टेशन, नागपूर येथे विद्‌यापीठाव्दारे दिनांक १९ मे, २०१६ रोजी लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस यंत्रणेमार्फत सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

---

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळाच्या इयत्ता ६ वी व १० वी पर्यंतच्या हिंदी भाषेतील पाठ्यपुस्तकात संविधानाच्या प्रस्तावनेत बदल केल्याबाबत**

**(१८) ५४१२४ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळाने इयत्ता ६ वी ते १० पर्यंतच्या हिंदी भाषेतील पाठ्यपुस्तकामधील संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष या शब्दाऐवजी, पंथनिरपेक्ष असा शब्द प्रयोग केला असून दिनांक २६ नोव्हेंबर, १९४५ या तारखेबरोबरच तिथीचा उल्लेख करुन जातीयवादी विचारसरणीचा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळाने संविधानाच्या प्रस्तावनेत अवमान केल्याप्रकरणी दिनांक २० मे, २०१६ वा त्या सुमारास तहसिलदार कार्यालय कराड यांच्यासमोर निदर्शने करण्यात आली तसेच जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे निवेदन देण्यात आले, असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या संविधानाच्या हिंदी भाषेच्या अधिकृत प्रतीमधील उद्देशिका पाठ्यपुस्तकांमध्ये घेण्यात आली आहे. यामध्ये "पथनिरपेक्ष" हा शब्द आहे.

भारत सरकारने प्रसिध्द केलेल्या हिंदी भाषेच्या संविधानाच्या अधिकृत प्रतिंमधील उद्देशिकेमध्ये दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ या तारखेबरोबरच तिथीचाही उल्लेख करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यापीठानी अनुदान आयोगाकडून मिळालेल्या निधीचा वापर न केल्यामुळे कोटयावधी रूपयांचा निधी पडून असल्याबाबत**

**(१९) ५४१६४ (२२-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील विद्यापीठानी अनुदान आयोगाकडून मिळालेल्या निधीचा वापर न केल्यामुळे कोटयावधी रुपयांचा निधी पडून असल्याचे आयोगाने जाहिर केलेल्या आकडेवारी वरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतेक विद्यापीठांनी आतापर्यंत (३१ मार्च २०१६ अखेरपर्यंत) ५० ते ६० टक्केच निधी खर्च केला असून नागपूर व सोलापूर विद्यापीठांनी जेमतेम १० टक्के निधीचा वापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठांच्या विकासासाठी देण्यात येणारा निधी हा आर्थिक तरतूदीकरिता पुरेसा नसल्यामुळेआवश्यक त्या सुविधा उपलब्ध करू देता येत नाही, अशी ओरड करणाऱ्या राज्यातील विद्यापीठांना निधी मिळूनही तो पडून राहिलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बाराव्या पंचवार्षिक योजनेत(२०१२-२०१७ पर्यंत) विद्यापीठांना (विद्यापीठ निहाय) आजमितीस किती कोटी रूपयांचा निधी आयोगाने दिला आहे व त्यापैकी किती निधी कोणकोणत्या प्रयोजनांसाठी खर्च करण्यात आलेला आहे,

(५) असल्यास याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निधीबाबत व किती खर्च करण्यात आला आहे याबाबतची विद्यापीठनिहाय माहिती सोबत जोडलेल्या पूरक टिप्पणीत नमूद केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रलंबीत क्रिडा संकुलांची कामे तातडीने सुरु करणेबाबत

**(२०) ५४१९७ (२२-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रिडा संकुलांची कामे प्रलंबीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्याठिकाणी शैक्षणिक संकुले आहेत अशा शैक्षणिक संकुलांच्या ठिकाणी विद्यार्थी विद्यार्थीनीच्या क्रिडा क्षेत्रातील सोयीकरीता तालुका क्रिडा संकुलांची उभारणी करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घोषीत केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दौलतनगर, ता.पाटण या तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाणी लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे नावाने शैक्षणिक संकुल नावारुपास आले असून तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असणा-या या शैक्षणिक संकुलात क्रिडा संकुल उभारण्यास क्रिडा विभागाने तात्काळ मान्यता देऊन निधी उपलब्ध करु द्यावा या करीता मा. क्रिडा व युवक कल्याण मंत्री यांचेकडे सातारा जिल्हा क्रिडा विभागाकडील सविस्तर प्रस्तावासह स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ व दिनांक ०८ मार्च,२०१५ रोजी पत्र व्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दौलतनगर, ता.पाटण याठिकाणी लोकनेते बाळासाहेब देसाई शैक्षणिक संकुलात क्रिडा संकुल उभारण्यास तात्काळ मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, एखाद्या तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी शासकीय जागा उपलब्ध होत नसले तर खाजगी व्यक्ती/संस्था यांच्याबरोबर सामंज्यस करार करुन जमीन प्राप्त करुन घेण्यात येते.
(३) व (४) होय, हे खरे आहे. पाटण तालुका क्रीडा संकुल उभारणेकरीता तालुका क्रीडा संकुल समिती, पाटण व बाळासाहेब देसाई फाउंडेशन, दौलतनगर, ता.पाटण, जि.सातारा यांच्यात करावयाचा सामंजस्य करारनामा शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील लोटे (ता. खेड) औदयोगिक वसाहतीमध्ये असलेल्या सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमता वाढीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ५४३१० (१०-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता. खेड,जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीमध्ये असलेल्या सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमता वाढीसाठी ३२ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाची निविदा प्रक्रिया दोन वर्षापूर्वी पूर्ण होवून देखील अदयाप कामाला सुरूवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काम प्रलंबित असल्यामुळे रासायनिक दुषित सांडपाणी थेट नदीत सोडण्यात येते, परिणामी वशिष्ठी आणि जगबुडी या खाडी व नदीपात्रातील मासे मृत होण्याचे प्रकार वारंवार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमता वाढीचे काम सुरू न होण्याची कारणे काय आहेत आणि त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (०५-१२-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सामुहीक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमतावाढीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने मे.ॲक्वाकेम एन्व्हारो इंजिनिअर्स प्रा.लि. या ठेकेदारास दि.२६.०५.२०१५ रोजी २६.१२ कोटी रुपयांचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही,

सदर कामास राज्यस्तरीय पर्यावरण मुल्यांकन समिती यांचेकडून दि.२८.०६.२०१६च्या आदेशान्वये पर्यावरण ना-हरकत दाखला मिळाला आहे व ठेकेदारामार्फत सदर कामाची सुरवात २० जुलै, २०१६ पासुन करण्यात आली आहे.

(३) लोटे औद्योगिक वसाहतीतून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित असून प्रक्रियाकृत सांडपाणी ७.४८ कि.मी. लांबीच्या वाहिनीद्वारे राष्ट्रीय समुद्री विज्ञान संस्था यांनी मंजूर केलेल्या ठिकाणी सोडण्यात येते. मासे मर्तुकीच्या तक्रारींच्या अनुषंगाने तहसीलदार, खेड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील किनारपट्ट्या दुषित असल्याचे 'रीफवॉच मरिन कन्झरर्वेशन' संस्थेने केलेल्या पाहणीत निदर्शनास आल्याबाबत**

**(२२) ५४४७२ (१०-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील किनारपट्ट्या या दुषित असल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत 'रीफवॉच मरिन कन्झरर्वेशन' या संस्थेने केलेल्या पाहणीत माहे जून २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या किनाऱ्यावर पिशव्या, अन्नपदार्थांची पाकिटे, सिगारेट, प्लास्टिकच्या बाटल्या, कप कागद आणि पॉलिथीन पिशव्या इत्यादीने सदर किनारपट्ट्या दुषित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कठोर नियम बनवून जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-१२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) "रिफवॉच मरिन कन्झरवेशन" या संस्थेने असे सर्वेक्षण केले असल्याचा अहवाल प्राप्त झाला नसल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे. त्यामुळे याबाबत पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठामार्फत माहे एप्रिल २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेत जर्नालिजमची चुकीची प्रश्नपत्रिका दिल्याबाबत**

**(२३) ५४५१८ (२२-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आलेल्या परिक्षेत जर्नालिजमची चुकीची प्रश्नपत्रिका दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून चुकीची प्रश्नपत्रिका देणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०९-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) दि.१६/०४/२०१६ रोजी दुपार सत्रात संबंधित परीक्षा केंद्रांना ७५ गुणांऐवजी ५० गुणांची प्रश्नपत्रिका प्राप्त झाल्याची त्रुटी मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील तक्रार कक्षास प्राप्त झाली. याबाबतची प्राश्निकाकडून खातरजमा करुन ७५ गुणांची प्रश्नपत्रिका ऑनलाईनव्दारे परिक्षा केंद्रावर उपलब्ध करुन देण्यात आली व सदर विषयाची परीक्षा सुरळीत पार पडली.

प्राश्निक प्रा.कौस्तुभ जोशी व प्रा.महेश सावळे यांना सदर गोंधळाबाबत कारणे दाखवा नोटीस बाजावली गेली व त्यांनी दिलेली खुलासा मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या होणा-या पुढील सभेत कार्यवाहीकरीता ठेवण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावी बोर्डाचे विभागीय मंडळ ठाणे जिल्हयामध्ये करण्याबाबत**

**(२४) ५४८४७ (२२-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावी आणि बारावी बोर्डाचे विभागीय मंडळ ठाणे जिल्हयामध्ये करण्याची मागणी अनेक शिक्षण तज्ञांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयामध्ये दहावी आणि बारावी बोर्डाचे एक लाखांहून अधिक विद्यार्थी संख्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे विभागीय मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे कर्मचारी महासंघटनेने मुंबई विभागीय मंडळाने विभाजन करण्याबाबत मागणी केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) यासंदर्भात अद्याप कोणताही प्रस्ताव राज्यमंडळामार्फत प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या शेकडो मुस्लीम तरुण विद्यार्थ्यांना शुल्क न भरल्याने परिक्षेला मुकावे लागल्याबाबत**

**(२५) ५५२६९ (२२-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मेहमुदूर रेहमान समितीचा अहवाल प्रसिध्द करण्याचे आश्वासन दिले होते मात्र या आश्वासनाची अद्याप पूर्तता केली नसल्याचे माहे एप्रिल-२०१६मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या शेकडो मुस्लीम तरुण विद्यार्थ्यांना शुल्क न भरल्याने परिक्षेला मुकावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही. शासन निर्णय दि.०६.०५.२००८ अन्वये मुस्लिम समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सद्य:स्थितीचा अभ्यास व पाहणी करुन त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनास उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.मेहम्मूदर रहेमान, सेवानिवृत्त भा.प्र.से., यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली होती. सदर अभ्यासगटाने आपला अंतिम अहवाल दि.२१.१०.२०१३ रोजी शासनास सादर केला असून, तो विभागाच्या या www.mdd.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला आहे. अहवाल पब्लिश करण्यासंदर्भातील आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४ प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील एम.ए.राज्यशास्त्रच्या अभ्यासक्रमात पंडित नेहरु यांचा धडा वगळल्याबाबत**

**(२६) ५५२८० (२२-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील एम.ए.राज्यशास्त्राच्या अभ्यासक्रमात पंडित नेहरु यांचा धडा वगळल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही. मुंबई विद्यापीठांच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या एम.ए. राज्यशास्त्र प्रथम वर्षाच्या पेपर नं. २ (बूक नं.२४२) मॉडर्न इंडियन पॉलिटिकल थॉट या संदर्भाचे छापील अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी देण्यात आले आहे. हा अभ्यासक्रम सन २००० पासून अस्तित्वात असून त्यावेळेपासूनच अभ्यासक्रमामध्ये पंडित जवाहरलाल नेहरु यांचा धडा नाही. या अभ्यासक्रमासाठी छापील स्वयं अध्ययन साहित्य दूर व मुक्त अध्ययन संस्थेमार्फत सन २०१३ ला पहिल्यांदाच तयार करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार त्याची पुर्नछपाई ऑक्टोबर, २०१५ मध्ये करण्यात आली आहे.

(२) उपरोक्त प्रकरणी दिनांक १७ मे, २०१६ रोजीच्या मिड डे वृत्तपत्रामध्ये बातमी छापून आल्याने मुंबई विद्यापीठाने या प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरीता सत्य शोधन समिती स्थापन केली होती. समितीने केलेल्या शिफारशींप्रमाणे अभ्यासमंडळाचे मत व पुस्तकाचे समन्वयक यांच्याकडून अभिप्राय प्राप्त होताच या प्रकरणी मुंबई विद्यापीठाकडून कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातूर (जि.अकोला) तालुक्यातील ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत एका शिक्षकाने दुसऱ्यांच्या नावाचे छायाचित्र वापरुन बनावट दस्तऐवज तयार करुन लाखो रुपयांची शिष्यवृत्ती उचल्याबाबत**

**(२७) ५५४०५ (२२-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यातील ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय उर्दू भाषा प्रचार परिषदेच्या नावाखाली एका शिक्षकांनी दुसऱ्यांच्या नावाचे छायाचित्र वापरुन बनावट दस्तऐवज तयार करुन लाखो रुपयांची शिष्यवृत्ती घेवून शासनाला फसविले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय उर्दू भाषा प्रचार संबंधित कोणतीही शिष्यवृत्ती योजना संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत राबविली जात नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालय शिक्षणातील संशोधन आणि गुणवत्तेसाठीचा निधी दिला नसल्याबाबत**

**(२८) ५५४८७ (२२-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालय शिक्षणातील संशोधन आणि गुणवत्तेसाठीचा निधी माहे मार्च, २०१६ उलटून गेला तरी महाविद्यालयांना दिला नसल्याचे माहे एप्रिल,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे सदर निधी महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०१-२०१७) :**(१), (२) व (३) सदर प्रश्न केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठ अनुदान आयोगाशी (पुणे येथील आयोगाच्या क्षेत्रीय कार्यालयाशी) संबंधित असून राज्य शासनाची संबंधित नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले येथील क्रीडा संकुलाचे काम गेल्या १० वर्षांपासून रखडले असल्याची बाब**

**(२९) ५५६३७ (२२-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले येथील क्रीडा संकुलाचे काम गत १० वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाच्या कामास सन २००५ मध्ये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती व त्यासाठी मंजूर झालेला निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत व काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २००९ मध्ये व त्यानंतर सन २०13 मध्ये सदर कामकाजास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. या कामासाठी वितरीत केलेला रु.४०.०० लाख एवढा निधी संकुल समितीकडे जमा आहे.
(३) व (४) तालुका क्रीडा संकुल, हातकणंगले साठी मौ.हातकणंगले येथील भूमापन क्र.९६६ मधील २.५० हे. जमीन ९९ वर्षाचे भाडेपट्टयाने नाममात्र रु.१/- भाडयाने प्राप्त झाली होती. परंतु दरम्यान सदर जागा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत झाल्याचे निदर्शनास आल्याने तहसील कार्यालय, हातकणंगले यांचे दिनांक ०६.०१.२००९ च्या आदेशान्वये परस्पर सरकार जमा करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील प्रक्रीया होऊ शकली नाही. सद्यस्थितीत तालुका क्रीडा संकुल, हातकणंगले साठी जागा प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत सुरु आहेत.

---

## मंद्रूप जि.सोलापूर येथील शेतकऱ्यांना शासनाच्या नविन बोअर घेण्याला २०० फूटांच्या खोलीची मर्यादा असल्यामुळे हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(३०) ५६१४३ (२०-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंद्रूप जि.सोलापूर येथील शेतकऱ्यांना शासनाच्या नविन बोअर घेण्याला २०० फूटांच्या खोलीची मर्यादा असल्यामुळे हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे सध्या पाण्याची पातळी ही ३५० फूटापेक्षा खोल आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे बोअरवेल घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०० फूट शासन नियम मर्यादित शिथिलता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम २५ अन्वये दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४५ गांवे टंचाई क्षेत्र म्हणून घोषित केलेली आहेत. सदर प्रभावक्षेत्रात सिंचनासाठी विहीर अथवा बोअर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि मौजे मंद्रूप, ता.दक्षिण सोलापूर येथील शेतक-यांकडून अथवा जिल्हाप्राधिकरणाकडून आर्थिक नुकसान झाल्याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झाल्याची जिल्हा कार्यालयात नोंद नाही.

(२) हे खरे नाही. मौजे मंद्रूप, ता.दक्षिण सोलापूर या गावाचा समावेश हा पाणलोट क्षेत्र क्रमांक बी एम ११० मध्ये असून मंद्रूप या गावात असणा-या निरिक्षण विहिरीची मागील पाच वर्षाची माहे मे अखेरील सरासरी पाणी पातळी ८.४६ मिटर इतकी असून माहे मे, २०१६ अखेरील पाणी पातळी ९.२५ मिटर इतकी आहे.
(३) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम ८ (१) अन्वये कृषि किंवा औद्योगिक वापरासाठी अधिसूचित आणि अधिसूचित नसलेल्या क्षेत्रांमध्ये खोल विहिरी खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.तथापि कलम ८ (१) मधील परंतुकानुसार पिण्याचे पाण्यासाठी ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विंधन विहिर/ कुपनलिका खोदण्याची परवानगी देण्याचे अधिकार, भूजल कायद्यामधील कलम १४ नुसार राज्यातील संबंधित महसूल विभागाचे उप विभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांना देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथे शिक्षकांचा पगार वेळेवर होत नसल्याबाबत**

**(३१) ५६२३३ (२२-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली येथे शिक्षकांचा पगार वेळेवर होत नसून, तो वेळेवर करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांना आदेश व्हावेत तसेच संचमान्यता तात्काळ पूर्ण करुन समायोजन, बदल्या वेळेवर करण्यात याव्यात इ. मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा शाखेच्या वतीने मा.शिक्षण सचिव यांना निदेवन देण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन सदर शिक्षकांच्या मागण्यांवर कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. विनोद तावडे (०५-०१-२०१७) :**(१) शिक्षकांचे वेतन वेळेवर अदा करण्यात येत आहे. संचमान्यता पूर्ण करण्यात आली असून संचामान्यतेप्रमाणे समायोजन व बदल्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना मुळ प्रवाहात सामील करुन घेण्याबाबत**

**(३२) ५६३०६ (२२-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रासह ग्रामीण भागामध्ये सुमारे ८१९३ मुले शाळाबाहय असल्याची तसेच पुणे आणि परिसरात शाळाबाहय सर्वेक्षणात २ हजार ६५९ मुले शाळेत जात नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सुमारे १००० हून अधिक मुली असुन, मुलांपैकी केवळ ५८८ मुले त्वरीत शाळेत दाखल झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात स्थलांतरी होणाऱ्या कुटुंबियांच्या मुलांचे सर्वेक्षण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करतेवेळी स्थलांतरीत कुटुंबे, मजूरांची मुले, वीटभट्टी, बांधकामे करणाऱ्या मजूरांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले यांची गणती होण्यासाठी तसेच जिल्ह्यातील हजारो शाळाबाहय मुलांच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना मुळ प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी आवश्यकत्या उपाययोजना करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करतेवेळी स्थलांतरीत कुटुंबे, मजुरांची मुले, विटभट्टी, बांधकाम करणा-या मजुरांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले यांची गणती होण्यासाठी सातत्यपूर्ण सर्वेक्षण केले जाते.

अशा हंगामी स्थलांतरीत होणा-या पालकांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून अशा मुलांसाठी हंगामी वसतीगृह योजना राबविली जाते. तरीसुध्दा मुल पालकांबरोबर स्थलांतरीत होत असल्यास स्थलांतरीत होणा-या प्रत्येक बालकांचे शिक्षण हमी पत्र तयार करण्याच्या सूचना क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. शाळाबाह्य मुलांना वयानुरुप नजीकच्या नियमित शाळेत दाखल करुन सर्व शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. तसेच स्थलांतरानंर मुले शाळेत प्रवेशित व्हावे याच्या पाठपुराव्यासाठी सरल या संगणक प्रणालीत व्यवस्था करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## नागपूर जिल्ह्यातील १२५ कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ५७७९४ (१०-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील १२५ कामे राष्ट्रीय पेजयल योजना बंद केल्यामुळे निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना ग्रामीण भागात राबविण्याकरिता केंद्र व राज्य शासनाकडून समांतर निधी देण्यात येत होता परंतु सदर योजना बंद पडल्यामुळे या योजनेशी संबंधित १२५ कामे अद्यापपर्यंत निधी अभावी होऊ शकली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनांची ७० टक्के कामे ग्रामीण भागात पूर्ण झाली असून उर्वरीत १२५ कामे ही निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे त्याकरिता १० कोटी रुपयांचा निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय पेयजल योजनेच्या उर्वरित कामांकरीता राज्य शासनाद्वारे पावसाळी अधिवेशन २०१६ मध्ये १० कोटी रुपयाचा निधीची तरतुद करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-१२-२०१६) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना बंद झालेली नाही. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सुरु असलेल्या कामांपैकी एकूण ११३ कामांकरिता केंद्र शासनाच्या हिश्श्याचा निधी वाटप न झाल्याने सदर कामे बंद करण्यात आली होती. तथापि मे २०१६ मध्ये रु. २.०० कोटी व जुलै २०१६ मध्ये रु. ३.०० कोटी असे एकूण रु.५.०० कोटी सदर कामांसाठी शासनाने उपलब्ध करुन दिले आहे. सदर निधीतून प्रलंबित कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हाताच्या रेषांवरुन ॲप्टिटयूड टेस्ट करणाऱ्या पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रमाणात झालेली वाढ

**(३४) ५८६४२ (२२-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाताच्या रेषांवरुन ॲप्टिटयूड टेस्ट करणाऱ्या पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले असून, यासाठी हजारो रुपये खर्ची घातले जात आहेत. दिवसेंदिवस पालकांचा वाढता कल पाहता अशा बाजारपेठांची उलाढाल ही लाखांच्या घरात असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणमंत्र्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचा कल कोणता आहे हे जाणून घेणे हे उत्तमच मात्र याच गोष्टींचा आधार घेत अनेकांनी करिअर मार्गदर्शन, बोटांच्या रेषांवरुन भविष्य, ॲप्टिट्यूड टेस्टची दुकानच तयार केली असून, पैशांसाठी पालकांची फसवणूक करणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) शासनाने विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केलेली आहे.
(३) यासंदर्भात शासनास अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा तालुक्यासाठी मंजूर असलेल्या तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या जागे बाबत**

**(३५) ५९३४८ (२२-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा तालुक्यासाठी मंजूर असलेल्या क्रीडा संकुलासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिनस्त असलेली जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे माहे डिसेंबर ,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. बुलढाणा तालुका क्रीडा संकुलासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिनस्त असलेली जागा उपलब्ध करुन घेणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू, जव्हार, सायवन, कासा व तलासरी तालुक्यात (जि.पालघर) १२ वी नंतर पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध होण्याबाबत**

**(३६) ५९५२९ (२२-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू, जव्हार, सायवन, कासा व तलासरी तालुक्यात १२ वी नंतर पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची सोय नसल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांची परवड होत असून उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने उक्त तालुक्यांमध्ये विविध शिक्षण उपलब्ध करुन देणारी दर्जेदार महाविद्यालये होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०१-२०१७) :**(१) नाही.

(२) पालघर जिल्ह्यात पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणारी एकूण ४० महाविद्यालये असून डहाणू, जव्हार, सायवन, कासा व तलासरी तालुकयात पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची ०७ महाविद्यालये आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीकरिता पुणे जळगाव अमरावती औरंगाबाद येथील विद्यापीठांनी पदनामात केलेला गैरव्यवहार**

**(३७) ५९७४६ (२२-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्लंबर आणि गवंडी या 'क' गटातील पदांना बांधकाम सहाय्यक असे पदनाम देवून त्यांची वेतन वाढ केली त्याचप्रमाणे पुणे, जळगाव, अमरावती, औरंगाबाद येथील विद्यापीठे कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीकरिता पदनामात गैरप्रकार करुन शासनाची कोटयवधी रुपयांची लुट करीत असल्याचे दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१२-२०१६) :**(१)सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ, अमरावती व डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठांनी पदनाम घोटाळा करुन शासकीय तिजोरावर कोटयावधी रुपयांचा भार टाकून विद्यापीठे शासनाच्या तिजोरीची लूट करीत असल्याबाबत दिनांक ११ एप्रिल, २०१६ च्या दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्राच्या मुंबई आवृत्तीमध्ये बातमी आलेली आहे.

(२) राज्यातील ज्या अकृषि विद्यापीठांच्या शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधातील पदनाम बदलांबाबत शासन निर्णय निर्गमित झालेले आहेत, त्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि.०४.०६.२०१६ व दि.०९.०६.२०१६ रोजी संबंधित विभागीय सहसंचालक व संबंधित विद्यापीठांचे अधिकारी यांचेसमवेत विभाग स्तरावर बैठका घेण्यात येऊन बदललेली पदनामे व वेतनश्रेण्या तसेच यामुळे शासनावर येत असलेल्या आर्थिक भाराबाबतची माहिती घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा येथील जिल्हा क्रीडा संकुलातील जलतरण तलाव व क्रीडा सुविधाच्या दुरावस्थेबाबत**

**(३८) ६०५०८ (२२-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील जिल्हा क्रीडा संकुलातील जलतरण तलावात दूषीत पाणी व सुविधांची दुरावस्था असल्याची तक्रार नागरिकांनी दिनांक १४ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर जलतरण तलाव, स्नानगृह, स्वच्छता गृह इत्यांदी सुविधांच्या दूरावस्थेमुळे महिलांची सुध्दा गैरसौय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि.१५.०७.२०१६ रोजी प्रत्यक्ष पहाणी करुन जलतरण तलाव भाडयाने दिलेल्या कंत्राटदारास करारनामा व अटी शर्तीनुसार पाण्याचे टेस्टींग, स्नानगृह, स्वच्छतागृह इत्यादी बाबींची पूर्तता करण्याबाबत दिनांक १८.०७.२०१६ च्या पत्रान्वये आदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार स्नानगृह, स्वच्छतागृह इत्यादी सुविधांची पूर्तता करुन घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नाशिक विभागीय मंडळाच्या नियोजित इमारतीच्या बांधकामाबाबत

**(३९) ६०८६५ (२२-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नाशिक विभागीय मंडळाच्या नियोजित इमारतीचे बांधकाम तातडीने सुरु करण्यात यावे अशा प्रकारची मागणी नाशिक (प) क्षेत्राच्या लोकप्रतिनिधीनी दि. १२.१.२०१५ रोजी शासनाकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) असल्यास, सदरहू इमारतीच्या बांधकामाबाबत असलेल्या अडीअडचणी दूर करुन बांधकामास मंजूरी देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे

(२) व (३) बांधकाम आराखडा, अंदाजपत्रक मान्य झाले असून ई-निविदा प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य कुस्ती संघटनेच्या कात्रज येथील केंद्रातील असुविधेबाबत

**(४०) ६१२६३ (२२-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कुस्ती संघटनेच्या कात्रज येथील केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांचा, प्रशिक्षकांचा अभाव, स्नानगृह व उपहारगृहाची सोय नसणे अशा विविध असुविधा असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलभूत सोयीसुविधा नसल्यामुळे येथे असणाऱ्या १२० कुस्तीगीरांच्या प्रगतीला खीळ बसली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर क्रीडा संकुलाची मालकी व देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत केली जात असल्यामुळे शासनाकडून प्रशिक्षक व इतर कर्मचारी नेमण्याचा प्रश्न येत नाही. मात्र कुस्तीगीर परिषदेकडून अधिकृत प्रशिक्षक नेमण्यात आलेला असून सद्य:स्थितीत प्रशिक्षण केंद्र सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे नियमीत संशोधक विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्तीबाबत**

**(४१) ६१२९५ (२२-०८-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे नियमीत संशोधक विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती मिळाली नसून, अशा प्रकारची शिष्यवृत्ती शेतकरी व शेतमजुर यांच्या पाल्यांना देण्याबाबतची घोषणा झाली असूनही संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे विद्यार्थी नियमीतपणे संशोधन करतात आणि ज्यांना राष्ट्रीय पातळीवरुन किवा युजीसी कडून शिष्यवृत्ती मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जात असून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना माहे एप्रिल, २०१५ पासून शैक्षणिक वर्ष संपले तरीही शिष्यवृत्ती मिळाली नाही, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, शासनाने या विद्यार्थ्यांना विद्यापिठाकडून शिष्यवृत्ती मिळवून देण्याकरिता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विद्यापीठातील प्रत्येक विभागाच्या एकूण चार नियमित संशोधक विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती विद्यापीठ निधीतून दिली जाते. ह्यासाठी प्रत्येक वर्षी एकूण ५० लाख रुपयांची आर्थिक तरतूद देखील करण्यात येत असते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासूनची मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती लक्षात घेता शेतकरी व शेतमजूराच्या पूर्ण वेळ संशोधन करणा-या पाल्यांना देखील शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या दि. १३/०१/२०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी रु.२५ लाखांची आर्थिक तरतूद केली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे थेट कर्ज मागणी अर्ज स्वीकारण्याबाबत**

**(४२) ६१५९० (२०-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन अंगीकृत मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या सन २०१३-१४ च्या थेट कर्ज योजनेअंतर्गत कोल्हापुर जिल्ह्यातून २१४२ थेट कर्ज मागणी अर्ज स्वीकारण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी महामंडळाकडून लॉटरी पध्दतीने ८८२ कर्ज प्रस्ताव मंजुर करणेत आले व त्यापैकी प्रथम यादीतील ४१० लाभार्थ्यांना कागदपत्रांची पुर्तता करुन कर्ज रक्कम वितरीत करण्यात आली. तर उर्वरित ४४२ लाभार्थ्यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रलंबित कर्ज प्रकरणांचे कागदपत्रे स्विकारून त्यांना कर्ज वितरीत करण्यास मान्यता देण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य, इचलकरंजी यांनी माहे एप्रिल २०१६ मध्ये मा. अल्पसंख्यांक विकास मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०१-२०१६)** :(१) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेअंतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात राज्यातील सर्व जिल्ह्यामधून अर्ज मागविण्यात आले होते. सदर कालावधीमध्ये थेट कर्ज योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हातून २२५० इतक्या व्यक्तींचे अर्ज प्राप्त झाले होते.

(२) थेट कर्ज योजनेंअंतर्गत राज्यातील अल्पसंख्यांक लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये कोल्हापूर जिल्ह्यासाठी ४४२ इतक्या लाभार्थ्यांना कर्ज मंजूर करुन वितरीत करण्याचे उद्दिष्ट महामंडळामार्फत निश्चित करण्यात आले होते. या लाभार्थ्यांची निवड लॉटरी पध्दतीने करण्यात आली व ४४२ इतके लाभार्थी प्रतिक्षायादीमध्ये ठेवण्यात आले होते.

(३) व (४) महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ९२ व्या बैठकीत प्रतिक्षा यादी व उर्वरित अर्ज दफ्तरी दाखल करण्यात यावेत. असा निर्णय घेण्यात आला. तसेच सन २०१४-१५ मध्ये २११ व सन २०१५-१६ मध्ये १२२ अशा एकूण ३३३ व्यक्तींना थेट कर्ज मंजूर केले आहे. १०९ अर्ज प्रलंबित आहेत. त्यापैकी ५७ लाभार्थ्यांनी वैधानिक दस्तऐवज व आगाऊ दिनांकित धनादेश सादर न केल्यामुळे अर्ज मंजूर करुन कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आलेली नाही व ५२ लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत. दि.३१ मार्च, २०१६ पर्यंत सर्व पात्र प्रकरणांना कर्जाची रक्कम वितरीत करण्याचे महामंडळाने निश्चित केले होते. ज्या लाभार्थ्यांनी वैधनिक दस्तऐवज व आगाऊ दिनांकित धनादेश सादर केले आहेत. परंतु कर्जाची रक्कम दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत वितरीत करण्यात आली नाही, अशा बाबतीत संचालक मंडळाच्या आगामी बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब जि. यवतमाळ येथील क्रिडा संकुलाच्या बांधकामासाठी दिलेला निधी अखर्चीत असल्याबाबत**

**(४३) ६१७०० (२२-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि. यवतमाळ) येथील क्रिडा संकुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून निधी प्राप्त होऊनही २ वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचे क्रिडा संकुलाचे बांधकाम झाले नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिडा संकुलाचे बांधकाम करण्याकरीता एकूण किती निधी देण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर बांधकाम कैंव्हापर्यंत पुर्ण करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. क्रीडांगण समपातळीत करणे व रिटर्निंग वॉलचे बांधकाम याकरिता रु.१५ लक्ष इतका निधी उपयोगात आणण्यात आला आहे.

(२) कळंब तालुका क्रीडा संकुल बांधकामासाठी टप्याटप्याने रु.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) व (४) कळंब तालुका क्रीडा संकुलाकरिता ग्रामपंचायत कळंब यांच्या ताब्यातील जागा प्राप्त झाली होती. परंतु महसूल विभागाकडून सदरची जागा क्रीडा विभागाकडे फेरफार करुन क्रीडा विभागाच्या नावे करण्याची कार्यवाही करत असताना सदर जागा ही खाजगी मालकीची असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर जागेवरील बांधकाम थांबविण्यात आले आहे.

---

**शासन मालकीची जमीन तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचे नावे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(४४) ६२५२० (२२-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील मौजे भोलावडे येथील गट क्र. ६०६, ६०७ व ६०८ मधील शासन मालकीची जमीन व वेल्हे तालुक्यातील मौजे निगडे येथील गट क्र. ६८२, ४८६ व ४१३ ही शासन मालकीची जमीन तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचे नावे हस्तांतरीत करण्याबाबत मा.क्रीडा व युवक कल्याण मंत्री महोदय यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ मार्च, २०१६ रोजी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे सोबत प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन त्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.०७.२०१६ व दिनांक ०६.१०.२०१६ रोजी तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार शासकीय जमीन मिळणेबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांनी तहसिलदार यांना विहीत नमुन्यातील अर्ज सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंब (जि. यवतमाळ) येथे चौकशीविना खाजगी जागेत बांधलेल्या क्रिडा संकुलाबाबत**

**(४५) ६२८०४ (२२-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि. यवतमाळ) येथे क्रिडा संकुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून प्राप्त झालेला रुपये १ कोटीचा निधी, क्रिडा अधिकारी यांनी जमिनी बाबत चौकशी न करता 'इश् क्लास ची जमीन समजून खाजगी जागेवर रुपये १५ लाख खर्च करून रिर्टनींग वॉल व लेव्हलींग केली असल्याचे दिनांक १० जून,२०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिडा अधिकारी व महसूल विभागाचे संबधित अधिकारी यांच्या दुर्लक्षित व निष्काळजीपणामुळे शासनाकडून आलेल्या निधी मधील १५ लाख रुपये निव्वळ वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झालेला खर्च संबधिताकडून वसुल करण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कळंब तालुका क्रीडा संकुल समितीच्या आगामी बैठकीमध्ये सदर बाब समितीच्या निदर्शनास आणुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली - चंद्रपूर) उत्तरपत्रिका मूल्यांकनात झालेला गैरप्रकार**

**(४६) ६३६४५ (२२-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली - चंद्रपूर) उत्तरपत्रिका मूल्यांकनात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे कुलगुरू डॉ. एन.व्ही. कल्याणकर यांनी तीन सदस्यीय समितीकडून चौकशी सुरू केली असल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्श्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने अहवाल सादर केला आहे काय, अहवालात नमूद केल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०१-२०१७)** :(१) होय. दि. २७ मे, २०१६ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने विद्यापीठाने चौकशी केली होती.
(२) वर्तमानपत्रात प्रसिध्द बातमीमधील आरोपांमध्ये कोणतेही तथ्य वा पुरावा नसल्याचा समितीने निष्कर्ष काढला आहे. तथापि, समितीने याबाबत काही शिफारशी केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रात्रशाळा बंद करुन त्याऐवजी पत्राद्वारे शिकणारा डिस्टन्स कोर्स सुरु करण्याची घोषणा

**(४७) ६३८०५ (२२-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शिक्षणाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत रात्रशाळा बंद करुन त्याऐवजी पत्राद्वारे शिकणारा डिस्टन्स कोर्स सुरु करण्याची घोषणा शिक्षण विभागाच्या सचिवांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवसभर काम करुन रात्रीच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी यावर्षी घवघवीत यश मिळविले असताना त्यांचे कौतुक करुन त्यांना प्रोत्साहित करण्याऐवजी रात्र शाळा बंद करण्याची घोषणा केल्यामुळे रात्रशाळा मुख्याध्यापक संघटनेने तीव्र विरोध केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रात्रशाळा चालू ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) रात्रशाळा बंद करण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम येथील जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयास गट-अ वरिष्ठ लिपिक व शिपाई या तीन पदानां मान्यता मिळेबाबत**

**(४८) ६८१९२ (१६-१२-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयास जिल्हा क्रिडा अधिकारी गट-अ वरिष्ठ लिपिक व शिपाई या तीन पदाना शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतर जिल्हा क्रिडा कार्यालयाप्रमाणे क्रिडा मार्गदर्शक, क्रिडातज्ञ, कनिष्ठ लिपिक, शिपाई ही पदे वाशिम येथे निर्माण केली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वाशिम येथे नविन पदे निर्माण करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींने दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०१-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

(४) व (५) इतर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाप्रमाणे वाशिम येथे क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा तज्ञ, कनिष्ठ लिपिक ही पदे निर्माण करण्याबाबत प्रस्ताव सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**शासनाने अनुदानित प्रवेशांच्या जागा व्यक्तीरिक्त काही विनाअनुदानित तुकडयांना मंजुरी दिल्याने खुल्या प्रवर्गातील अर्थिक दृष्टया कमकुवत विद्यार्थ्यांकडून संस्थाचालक अवाजवी शुल्क आकारित असल्याबाबत**

**(४९) ६९६८२ (१६-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात २८ शासकीय अनुदानित ११७२ विनाअनुदानित आणि १७२३ अंशत: अनुदानित महाविद्यालये असून यामधून पदवी पदव्यूत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. शासनाने अनुदानित प्रवेशांच्या जागा व्यक्तीरिक्त काही विनाअनुदानित तुकडयांना मंजुरी दिल्याने खुल्या प्रवर्गातील अर्थिक दृष्टया कमकुवत विद्यार्थ्यांनकडून संस्था चालक अवाजवी शुल्क आकारित असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून अवास्तव शुल्क वसुल करणाऱ्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७)** :(१) नाही. याबाबत कोणतीही तक्रार अद्याप प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) विहित नियमानुसार निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्क आकारणा-या शैक्षणिक संस्थाविरुध्द महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ अंतर्गत कारवाई करण्याची तरतूद आहे.

---

**राज्य मराठी विकास संस्थेला पूर्ण वेळ संचालकाची नेमणूक करण्याबाबत**

**(५०) ७१८७२ (१६-१२-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी विकास संस्थेला गत अनेक वर्षापासून पूर्ण वेळ संचालक मिळाला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेमध्ये पूर्ण वेळ संचालक यापदासाठी माहे जानेवारी, २०१० पासून तर पूर्णवेळ उपसंचालक या पदासाठी माहे मे, २००९ पासून भरती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक पदाच्या शिफारशीची अनेक पत्रे शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आली होती,तसेच निवड समितीच्या तीनही सदस्यांनी मा.शिक्षणमंत्र्याना बंद लिफाफ्यातून नावाची शिफारस असलेली पत्रे दिनांक १५ मार्च, २०१५ रोजी वा त्यादरम्यान सादर केलेली असतानाही आजमितीस पूर्णवेळ संचालक पदावर नियुक्ती झाली नसल्यामुळे भाषेच्या विकासाचे प्रचंड नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, सदर संस्थेला पूर्णवेळ संचालकांची तातडीने नेमणूक करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०१-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेच्या तरतूदीनुसार संचालक पदाच्या निवडीसाठी निवड समितीच्या उपस्थित सदस्यांनी बंद लिफाफ्यातून एकाच नावाची शिफारस केली होती. तथापि सदर व्यक्तीची संस्थेतील कामगिरी समाधानकारक नसल्याने निवड समितीच्या अध्यक्षांनी सदर निवड प्रक्रिया रद्द करुन नव्याने निवड प्रक्रिया सुरु करण्याबाबत निदेश दिले आहेत.

दरम्यान संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत सुरु राहण्याकरीता दि.१५.८.२०१५ पासून राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ.आंनद काटीकर, सहप्राध्यापक, फर्ग्युसन महाविद्यालय यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच नियामक

मंडळाची पुनर्रचना केल्यानंतर संस्थेच्या विद्यमान घटनेतील काही तरतूदी कालबाह्य झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे घटना दुरुस्तीचा प्रस्ताव, सादर करण्यात आला आहे. संस्थेच्या घटना दुरुस्तीचे काम अंतिम झाल्यानंतर सुधारित तरतूदीनुसार संचालक पदावरील पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.